जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३७९ दिनांक - १४/०९/२०२४**

युनिट २ गुन्हे शाखा पुणे शहर

## रेकार्डवरील मोबाईल चोरटयाकडुन ३,७५,०००/- रु.चे १६ मोबाईल फोन गुन्हे शाखा युनिट २ कडुन जप्त

गणपती उत्सवानिमित्त **मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री.निखिल पिंगळे** यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ प्रभारी प्रताप मानकर,यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलिंग करीत असताना पथकातील पोलीस अंमलदार **विनोद चव्हाण,पुर्ष्पेद्र चव्हाण,शुभम देसाई** यांना बातमी मिळाली की,पुणे स्टेशन परिसरात रेकार्डवरील आरोपी उमर सलीम शेख हा काळे रंगाचे ब्लॅगमॅन मोपेडवर उभा राहिलेला आहे. मिळालेल्या बातमी प्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ कडील अधिकारी व अंमलदार यांनी पुणे स्टेशन परिसरात जावून इसम नामे **उमर सलीम शेख वय १९ वर्ष रा. ग.न.१ पिताश्री आश्रम जवळ शिवनेरीनगर कोंढवा खुर्द पुणे** यास काळे रंगाचे ब्लॅगमॅन मोपेड हिचेसह ताब्यात घेतले.त्याचे मोपेडचे डिकी मध्ये व त्याचेजवळ एकुण १६ मोबाईल फोन मिळून आले असता ते जप्त करण्यात आले आहेत.नमुद इसमाचे शर्टमध्ये मिळून आलेल्या मोबाईल फोनबाबत **समर्थ पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्रमांक १९७/२०२४ भादविक ३९२** मधील जबरी चोरीचा गुन्हा दाखल असलेबाबत खात्री झाली.सदर गुन्हा हा त्यानेच केलेबाबत चौकशीवरुन निष्पन्न झाले. सदर आरोपीस वैदयकिय तपासणी करुन पुढील कायदेशीर कारवाई कामी समर्थ पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्रमांक १९७/२०२४ भादविक ३९२ कामी पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री.निखिल पिंगळे, मा.सहायक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री.गणेश इंगळे यांचे मागदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ प्रभारी पोलीस निरीक्षक श्री.प्रताप मानकर, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र पाटोळे,पोलीस हवालदार संजय जाधव, शंकर नेवसे,उज्वल मोकाशी,शंकर कुंभार,निखिल जाधव,साधना ताम्हाणे,उज्वल मोकाशी, शुभम देसाई नागनाथ राख या पथकाने केली आहे.


गुन्हे शाखा, पुणे शहर
युनिट -२